मागील वर्षीच्या सफल मोर्च्यानंतर आपण सर्व पुन्हा एकदा अनेक आशा मनाशी होऊन मुंबईत ''क्वीअर आझादी मार्च'' साठी एकत्र आलो आहोत. नुकताच दिनांक २ जुलै २००९ रोजी मा. दिल्ली हायकोर्टाने (उच्च न्यायालयाने) ऐतिहासिक निकाल दिला आहे : आय.पी.सी. (भारतीय दंड विधान) कलम ३७७ अन्वये दोन सज्ञान व्यक्तींमध्ये परस्पर सहमतीने केलेल्या समलैंगिक संबंधाना कायद्याने अपराध ठरविले जात असे. ब्रिटीश काळापासून चालत आलेल्या या कायद्यामधील, समलैंगिकांना अन्यायकारक असलेल्या भागात सुधारणा करून भारतीय न्यायव्यवस्थेने आमची सर्वात प्रमुख मुलभूत मागणी पूर्ण केली आहे. ही आमच्यासाठी एक अत्यंत महत्वाची बाब आहे.

तर मग आपल्या मनात प्रश्न उद्भवेल की, मग ही क्वीयर आझादीची घोषणा का ? याचे कारण असे की, मा. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निकालानंतरसुध्दा देशातील लाखो क्वीयर नागरिकांना त्यांचे स्वातंत्र व मुलभूत अधिकार यापासून अद्यापही वंचित ठेवण्यात आले आहे.

आपण विचाराल की, हे **<u>क्वीयर लोक कोण ?</u>** क्वीयर म्हणजे ''विचित्र'' या शब्दाचा वापर समलैगिकांना तुच्छतादर्शक संबोधन म्हणून केला जात होता. याच शब्दाला नवा अर्थ देत, आम्ही तो आमची ओळख म्हणून स्विकृत केला आहे आणि आज गर्वाने सांगू इच्छितो की आम्ही ''क्वीयर'' आहोत. क्वीअर म्हणजे एल.जी.बी.टी. म्हणजेच लेस्बियन, गे, बायसेक्स्युयल, ट्रान्सजेन्डर, इन्टरसेक्स लोक किंवा हिजडा, कोती, पणती इ. शब्दांनी संबोधिल्या जाणा-या सर्व व्यक्ती.

केवळ स्त्री व पुरूष या दोनच लिंगांना मान्यता देऊन त्यांच्यातील परस्पर संबंधांनाच नैर्सगिक मानणा-या या विषमलैंगिकताप्रधान समाजात आम्हा समलैंगिक व्यक्तींचे अस्तित्वच नाकारले जात आहे व आमच्या शारिरिक व भावनिक संबंधांना अनैतिक / अपराध ठरविले जात आहे. आज ही समाज आमच्या बाबतीत भेदभाव करतो. आज ही आमच्याकडे तिरस्कार व भीतीच्या नजरेने बघितले जाते. हे सर्व कमी होते की काय म्हणून आता, दिल्ली हायकोर्टाने दिलेल्या २ जुलैच्या साध्या सोप्या सुस्पष्ट निकालाविरूध्द सर्व कट्टरवादी धार्मिक गट उभे ठाकले आहेत आणि त्याला आव्हान देत समाजामध्ये आमच्या विषयी गैरसमज व खोट्या अफवा पसरवित आहेत की, समलैंगिकता हा एक रोग आहे, समलैंगिकता हा भारतीय संस्कृतीचा भाग नाही तर हे पश्चिमात्यांचे अंधानुकरण आहे.

पण सत्य हे आहे की, समलैंगिकता व समलैंगिक हे नेहमीच भारतीय समाजाचा व संस्कृतीचा अविभाज्य घटक राहिले आहेत. इतर विषमलैंगिक नागरिकांप्रमाणे आम्हा समलैगिंकांनाही या समाजात स्वतःचे स्थान मिळण्याचा व आमच्या अस्तित्वाचा समाजाने स्विकार करण्याचा नैर्सगिक अधिकार आहे. आम्हालाही या समाजात भेदभावाशिवाय प्रतिष्ठापूर्वक जीवन जगण्याचा संपूर्ण हक्क आहे.

१५ ऑगस्ट हा आपला स्वातंत्र दिन आहे. परंतु आज ही लाखो क्वीयर नागरिक आपल्या मुलभूत मानवी अधिकारांशिवाय पारतंऱ्याचे जीवन जगत आहेत आणि याचा लोकशाही मार्गाने

प्रतिकार करण्यासाठी स्वातंत्र्यदिनाच्या दुस-या दिवशी आमच्या स्वातंत्र्याचा लढा पुकारत मुंबईच्या रस्त्यांवर उतरलो आहोत.

या रॅलिच्या माध्यमातून आम्ही सरकार व समाजासमोर आमच्या पुढील मागण्या ठेऊ इच्छितो.

१. कलम ३७७ बाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या कलमात समलैंगिकांवर अन्याय होणार नाही अशी सुधारणा करण्याची आम्ही मागणी करत आहोत.

२. लिंग व लैंगिकतेवर आधारित भेदभावाविरूध्द संविधानातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करून हा भेदभाव समुळ नष्ट करण्यासाठी कायदे तयार केले जावेत.

३. समलैंगिकांमध्ये जे तृतीयपंथी लोक आहेत, ज्यांचे केवळ स्त्रि व पुरूष या दोनच लिंगांना कायदेशीर मान्यता देणा-या समाजात कोणतेही स्थान किंवा अस्तित्व नाही, त्यांच्या अस्तित्वाला कायद्याने मान्यता मिळावी व स्त्रि-पुरूषांना जे नागरी अधिकार प्राप्त आहेत ते सर्व अधिकार उपभोगण्याचा हक्क त्यांनाही मिळावा (उदा. मतदार यादीत नाव, पासपोर्ट, इलेक्शन कार्ड इ.)

४. आरोग्य सेवा पुरविणा-या व्यक्ती व संस्थाकडून समलैंगिकांच्या अस्तिव व गरजांबाबत योग्य वैज्ञानिक दृष्टीकोन वापरण्यात यावा, जेणेकरून आम्हा समलैंगिक व्यक्तींना आजारी किंवा विकृत मनोवृत्तीचे लोक मानून आमचा इलाज करण्याच्या नावाखाली होणारा भयानक व क्रुर असा मानसिक व शारिरिक छळ बंद होईल.

५. आपल्या समाजात लग्न अनिवार्य मानले जाते व प्रत्येक व्यक्तीला लग्न करण्यासाठी दबाव आणला जातो. ब-याच वेळा समलैंगिक व्यक्तींची बळजबरीने विषमलैंगिक व्यक्तींबरोबर लग्ने लावली जातात. यामुळे त्यांचे आयुष्य उध्वस्थ होते. अशा बळजबरीने लावण्यात येणा-या लग्नांविरूध्द आम्ही लोकशाही मार्गाने लढा पुकारत आहोत.

६. क्वीयर लोकांचे कुटूंब, शैक्षणिक संस्था, कार्यालय आणि सार्वजनिक ठिकाणी होणा-या व्देष आणि हिंसे पासून संरक्षण करण्यात यावे. विशेषतः कट्टरवादी धर्मांध व्यक्तीं व विशिष्ट दबावसमुदायाकडून आमच्याबाबत जे घाणेरडी वक्तव्ये करण्याचे व समाजात विष पसरविण्याचे काम सुरू आहेत त्यांला तात्काळ आळा घालण्यात यावा व संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी.

आज एकत्र आलेल्या लोकांमध्ये फक्त समलैंगिक व्यक्तीच नाहीत, तर यात आमचे अनेक मित्र, नातेवाईक, स्वयंसेवी संस्था, स्त्री स्वातंत्र्यवादी संघटना महाविद्यालयांचे विद्यार्थी आणि समलैंगिकाच्या विषयी स्वतः समलैंगिक नसुनही आपुलकी असणारे लोकही सामिल झाले आहेत.

आपणही आपला अल्पसा वेळ आमच्या सोबत घालवा. चार पावले आमच्या सोबत चला. आपला आवाज आमच्या आवाजात मिळवा अन् त्याचा ध्वनी दशादिशात दुमदुमवा।

क्विअर आजादी, मुंबई